# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२४-२३** **दिनांक :- १४/०७/२०२३**

## वालीव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील फादरवाडी येथील HIT & RUN केस मधील वाहन चालकास अवघ्या १२ तासांत ताब्यात घेवुन गुन्हयांची उकल. वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

वालीव पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रात दिनांक १०/०७/२०२३ रोजी सकाळी ०६.४५ वाजताचे सुमारास एका ॲक्टीवा मोटार सायकलवरुन दोन भाऊ हे फादरवाडी सिग्नल जवळील पेट्रोल पंपावरती पेट्रोल टाकुन पुढे देवदर्शनसाठी तुंगारेश्वर येथे जात असतांना त्यांना एका अज्ञात इनोव्हा वाहन चालक यांने फादरवाडी सिग्नलवरती जोरात ठोकर मारुन त्यात त्यांचे डोक्यास, हातापायास गंभीर व किरकोळ स्वरुपाच्या दुखापती करुन अपघाताची खबर न देता पळुन गेलेबाबत पोलीस ठाण्यात माहिती मिळाली होती तसेच घटनेचे वेळी घटनास्थळी हजर असलेल्या जमावापैकी कोणीतरी घटनेचे वेळीची व्हिडीओ क्लिप बनवुन ती सोशल मिडीयावरती प्रसारीत केलेली होती.

तदनंतर जखमी मुलांचे वडीलांनी अज्ञात वाहन चालक आरोपीताविरुध्द दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ५९१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.कायदा कलम १८४, १८५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शप्रमाणे वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रीक विश्वलेषणाचे आधारे प्राप्त माहितीच्या आधारे वर नमुद गाडीचा चालक आरोपीत नामे अर्जुन राजेंद्र श्रीवास्तव, रा. विमल रेसीडंन्सी, यशवंत गौरव, फन फिअेस्टा रोड, नालासोपारा पुर्व यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. श्री. ज्ञानेश फडतरे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्रीमती पोर्णिमा चौघुले - श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी केली आहे.

**-----0000------**